# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २६३ - २३** **दिनांक : - १६/०८/२०२३**

**वाहन चोरी, घरफोडी व चोरी करणाऱ्या गुन्हेगारांना अटक करुन ९ गुन्हयांची उकल**
**वालीव पोलिस ठाणे - गुन्हे प्रकटिकरण शाखेची कामगीरी**

वालीव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक ०५/०८/२०२३ रोजी सांयकाळी ७.३० वा. ते दिनांक ०६/०८/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वा. चे दरम्यान समतानगर, शारदा मेडीकल, मोर्यानाका, सातीवली, वसई पुर्व, जि. पालघर येथे राहणारे फिर्यादी यांनी त्यांचे राहते घरासमोर पार्क केलेली त्यांचे मालकीची बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटार सायकल ही अज्ञात चोरटयाने चोरी केलेबाबत दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलिस ठाणे गु.र.क्र. ६६०/२०२३ कलम ३७९ भा.दं.वि.सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने तांत्रीक विश्लेषणाचे आधारे तसेच गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे गुन्हयांचा तपास करुन आरोपी नामे १) आकाश गणेश इंगळे, वय २६ वर्ष, रा. सातिवली, वसई पुर्व २) अक्रम अब्दुल हकीम चौधरी, वय २५ वर्ष, रा. सातिवली, वसई पुर्व ३) अशिष गणेश ससाणे, वय २३ वर्ष, रा. सातिवली, वसई पुर्व, ४) रवि राधेश्याम वर्मा, वय- २८ वर्ष, रा. वालीव, वसई पुर्व यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हात अटक करुन वालीव पोलीस ठाणे गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत यांच्याकडे कौशल्याने अधिक तपास केला असता त्यांनी वालीव पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील खालील गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले. गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे दागिणे, मोटारसायकल, मोबाईल, लॅपटॉप व रोख रक्कम असा एकुण रु. ४ लाख ४३ हजार २०० किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**- उघडकीस आलेले गुन्हे -**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | वालीव | ६६०/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९,३४ ( मुळ गुन्हा ) |
| २. | वालीव | ६३७/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५७,४५४,४२७,३८०,३४ |
| ३. | वालीव | ६१६/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५४,४५७,३८०,३४ |
| ४. | वालीव | ६५३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५४,४५७,३८० |
| ५. | वालीव | ६५६/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ |
| ६. | वालीव | ६५१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ |
| ७. | वालीव | ६६५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३८० |
| ८. | वालीव | ६५९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५४,३८० |
| ९. | वालीव | ६२८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५४,४५७,३८० |

वरील कामगीरी श्रीमती पौर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ- २ वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयराज रणवरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. जिलानी सय्यद यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. सचिन सानप, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अं. विनायक राऊत, अभिजीत गढरी यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.